Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक २५] गुरूवार ते बुधवार, नोव्हेंबर ५-११, २०२०/कार्तिक १४-२०, शके १९४२ [पृष्ठे १५, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ११६.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ०३ जुलै २०२०.

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२४१९-१२८२-प्र. क्र. १३८-नवि-९-२०१९.—

ज्याअर्थी, नागपूर येथील विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-सी. आर.३००(ए)/नवि-९, दिनांक ०७ जानेवारी २००० व अधिसूचना क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र.२००-२०००-नवि-९, दिनांक १० सप्टेंबर २००१ अन्वये मंजूर झाली असून ती अनुक्रमे दिनांक ०१ मार्च २००० व २१ सप्टेंबर २००१ पासून अंमलात आली आहे. (“ उक्त विकास योजना ” असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजे जयताळा येथील खसरा क्र. ७ (भाग) क्षेत्र १.२२ हेक्टर ही जागा “ आरक्षण क्र एमडब्ल्यू-२३ महानगरपालिका नाका” विस्तारीकरण (Extension to NMC Naka) यासाठी आरक्षित आहे. (यापूढे “ उक्त आरक्षण ” असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी नियोजन प्राधिकरण (यापूढे “ उक्त नियोजन प्राधिकरण ” असे संबोधले आहे) म्हणून, त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २६४, दिनांक २४ सप्टेंबर २०१८ नुसार उक्त आरक्षण वगळून सार्वजनिक / निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करण्याचे ठरवून, त्या अनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापूढे “ प्रस्तावित फेरबदल” असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ३७(२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकाराचा वापर करुन उक्त विकास योजनेतील, उक्त प्रस्तावाखालील उक्त फेरबदलास मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ०९ सप्टेंबर २०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार, शासन पुढीलप्रमाणे मान्यता देत आहे, आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे;

“उक्त विकास योजना मंजुरीच्या दिनांक ०७ जानेवारी २००० च्या अधिसूचनेच्या फेरबदल सूचितील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे” —

**नोंद**

मौजे जयताळा येथील खसरा क्र. ७ (भाग) क्षेत्र १.२२ हेक्टर ही जागा “ आरक्षण क्र. एमडब्ल्यू-२३ महानगरपालिका नाका” विस्तारीकरण (Extension to NMC Naka) मधुन वगळून नकाशात दर्शविल्यानुसार सार्वजनिक / निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत अधिसूचना / भाग नकाशा आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्या कार्यालयात, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येत आहे.

सदर अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**प्र. प्र. सोनारे,**
कार्यासन अधिकारी.

---

भाग १-अ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ११७.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated 03rd July 2020.

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-2419-1282-CR-132-UD-9-2019.—

Whereas, Revised Development Plan of Nagpur has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department’s Notification No . TPS 2496-2643-CR-300(A)-97-UD-9, dated 7th January, 2000 and Notification No . TPS 2400-1628-CR-200-2000-UD-9, dated 10th September, 2001 and has come into force with effect from the 1st March, 2000 and 21st September, 2001 respectively. (hereinafter referred to as “the said Development Plan”);

And whereas, the said Development Plan, land bearing Khasara No. 7(pt.) admeasuring area about 1.22 Ha. of Mouja Jaitala is reserved for Site No. MW-23 Extension to NMC Naka (hereinafter referred to as “the said Reservation”);

And whereas, the Nagpur Municipal Corporation, Being the Planning Authority (hereinafter referred to as “the said Planning Authority”), *vide* its General Body Resolution No. 264, dated 24th September, 2018 has resolved to delete the said Reservation and to include the same in Public/ Semi Public Zone. Accordingly after following at the legal procudure as per the provisions of sub-section *(1)* of Section 37 of the said Act, submitted a modification proposal to the Government, for its sanction, (hereinafter referred to as “the Proposed Modification”);

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning Maharastra State, Pune, the Government is of opinion that the proposed Modification should be sanctioned;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under Section 37*(2)* of the said Act and according to cabinet approval dated 09th September, 2019, the Government hereby, sanctions the said Modification Proposal and for that purpose amends the said Development Plan as follows;

"In the Schedule of Modification appended to the Notification dated 7th January, 2000 sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry".—

*ENTRY*

The land bearing Khasara No. 7(pt.) admeasuring area about 1.22 Ha. of Mouja Jaitala is deleted from Site No. MW-23 Extension to NMC Naka and included in Public/ Semi Public Zone, as shown on plan –

A copy of the Notification, along with the part plan showing the aforesaid sanctioned modification, shall be available for inspection of the general public, in the office of the Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur during office hours on all working days for a period of one month.

This Notification shall also be available on the Government website– *www.maharatra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. P. SONARE,
Section Officer.

---

भाग १-अ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ११८.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

**वाचा :** शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्रमांक पंसनि -२०१८-प्र.क्र. २१८(२)-पंरा-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९.

**आदेश**

क्रमांक साशा-कार्या-१२-टे-३-पंसनि-३२३२-२०१९.—

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्रमांक पंसनि-२०१८-प्र.क्र. २१८(२)-पंरा-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदाचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २ फ (२) (५) मधील तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यामधील महिलासह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या पंचायत समित्यांच्या (भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४ अन्वये राष्ट्रपतीने जाहीर केलेल्या अनुसूचित क्षेत्रात पूर्णतः येणा-या पंचायत समिती वगळून) सभापतीच्या पदाचे चंद्रपूर जिल्ह्यांत वाटप करण्यात आले आहे.

आणि, ज्याअर्थी उक्त नियम, २ (फ) पोटनियम (२) अ व ब (३) मधील तरतुदीनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाची पदे अशा जाती किंवा जमातीच्या लोकसंख्येची पंचायत समितीच्या एकूण लोकसंख्येची टक्केवारी सर्वात अधिक असेल (सन २००२ ते २०१७ यावर्षी आरक्षित झालेल्या पंचायत समिती वगळून) पंचायत पंचायत समिती पासून सुरूवात करून उतरत्या क्रमाने आरक्षण वितरीत करण्यात आले.

आणखी, ज्याअर्थी उक्त नियम, २ फ (क) अ व ब मधील तरतुदीनुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी राखून ठेवावयाची पदे (सन २००२ ते २०१७ यावर्षी आरक्षित झालेल्या पंचायत समिती वगळून) जिल्ह्यांतील पंचायत समित्यामध्ये सोडत काढून वितरीत करण्यात आले. तसेच, उक्त नियम, २ फ पोटनियम (५) अ व ब मधील तरतुदीनुसार महिलासाठी राखून ठेवावयाची पदे (यापूर्वी सन २००२ ते २०१७ वर्षाचे आरक्षण वगळून)सोडत काढून वितरीत करण्यात आले.

आता, त्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदाचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ चे नियम २ क मधील पोटनियम २ (अ) ३ (अ) ४ (अ) व ५ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी, चंद्रपूर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, याद्वारे चंद्रपूर जिल्ह्यांतील पंचायत समितीच्या सभापतीची पदे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) बिनराखीव / अनारक्षित आणि महिला (अशा जाती, जमाती आणि नागरिकांचा

मागासवर्ग प्रवर्ग यामधील महिलासह) अनुसूचीच्या स्तंभ (२) समोर दर्शविलेल्या पदाचे स्तंभ (३) मधील पंचायत समितीकरिता राखीव पदे म्हणून अधिसूचित करीत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | पंचायत समिती सभापती पदाचे आरक्षणाचा प्रकार | पंचायत समितीचे नांव |
|---|---|---|
| १ | अनुसूचीत जाती | वरोरा |
| २ | अनुसूचीत जाती (महिला) | चंद्रपूर |
| ३ | अनुसूचीत जमाती | पोंभूर्णा |
| ४ | अनुसूचीत जमाती (महिला) | कोरपना |
| | | भद्रावती |
| ५ | नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) | मूल |
| | | चिमूर |
| ६ | नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग (महिला) | सिंदेवाही |
| | | जिवती |
| ७ | सर्वसाधारण (महिला) | गोंडपिपरी |
| | | राजूरा |
| | | बल्लारपूर |
| ८ | सर्वसाधारण | ब्रम्हपूरी |
| | | नागभीड |
| | | सावली |

शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाची, अधिसूचना क्रमांक पंसनि-२०१८/प्र.क्र.२१८(२)/पंरा-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये अधिसूचित पंचायत समितीच्या बाबतीत त्यांना सध्या लागू असलेल्या आरक्षणाची मुदत समाप्तीच्या दिनांकांपासून लगतच्या दिवसापासून सुरु होणा-या कालावधीकरिता लागू राहील.

चंद्रपूर :
दिनांक १६ डिसेंबर २०१९.

**डॉ. कुणाल खेमनार,**
जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

---

भाग १-अ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ११९.

**आदेश**

क्रमांक साशा-कार्या-१२-टे-३-कृउबाससानि-१८-२०२०.—

राज्य सहकारी प्राधिकरण, पुणे यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम, २०१७, दिनांक १८ डिसेंबर २०१७ चे नियम ३४ व ६५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी, जिल्हाधिकारी, चंद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समिती, सावलीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२० मध्ये निवडून आलेल्या / बिनविरोध निवडून आलेल्या सदस्यांची नावे खालील अनुसूचीत दर्शविल्या प्रमाणे याद्वारे घोषित करीत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | कृषी उत्पन्न बाजार समितीचे नांव | गणाचे नांव व क्रमांक | निवडून आलेल्या सदस्यांचे नांव | कायमचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | कृषी उत्पन्न बाजार समिती, सावली | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. १-अंतरगांव | धाईत प्रमोद मधुकर | रा. निफंद्रा, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| २ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. २-बोरमाळा | वाढणकर मायाबाई गंगाधर | रा. व्याहाड खुर्द, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| ३ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. ३-उसरपारचक | लोडे खुशाल थामदेव | रा. सायखेडा, ता. सावली, जि. चंद्रपूर |

**अनुसूची—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ४ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. ४-गायडोंगरी | शेरकी हिवराज शामराव | रा. थेरगांव, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| ५ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. ५-पाथरी | ठिकरे अशोक खुशाबराव | रा. पाथरी, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| ६ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. ६-चकपिरंजी | गड्डमवार दयाकर पुरुषोत्तम | रा. बोथली, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| ७ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. ७-चिचबोडी | सुरमवार निखील नरेश (बिनविरोध) | रा. व्याहाड, खुर्द ता. सावली, जि. चंद्रपूर |
| ८ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. ८-व्याहाड बुज | भांडेकर दिवाकर भैय्याजी | रा. सामदा बुज, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| ९ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. ९-निलसनी पेठगांव | बोदलकर खुशाल देवराव (बिनविरोध) | रा. उपरी, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| १० | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. १०-हरंबा | मर्लावार तुळशिराम बिरा (बिनविरोध) | रा. खेडी, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| ११ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. ११-घोडेवाही | वरगंटीवार अंकुश अरुण | रा. जिबगाव, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| १२ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. १२-चांदली बुज | येलट्टीवार सागर मधुकर (बिनविरोध) | रा. खेडी, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| १३ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. १३-कोंडेखल | तिवाडे अनिल भाऊराव | रा. जांब रै., ता. सावली, जि. चंद्रपूर |
| १४ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. १४-सावली | गेडाम सुनिल परमानंद | रा. सावली, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| १५ | | शेतकरी मतदार संघ, गण क्रं. १५-कवठी | पोटे मिराबाई रमेश | रा. पारडी. ता. सावली, जि. चंद्रपूर |
| १६ | | व्यापारी मतदार संघ, | चिटनूरवार प्रशांत मनोहर | रा. केरोडा. ता. सावली, जि. चंद्रपूर |
| १७ | | व्यापारी मतदार संघ, | तंगडपल्लीवार सचिन सुधाकर | रा. कापसी, ता. सावली, जि. चंद्रपूर |
| १८ | | हमाल/मापारी मतदार संघ | फुलके सुरेश चिरकुटा | रा. निमगांव, ता. सावली, जि. चंद्रपूर |

चंद्रपूर :
दिनांक १३ जानेवारी २०२०.

**राहुल कर्डीले,**
जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

ना.-एक-अ-२ (१६४४).

भाग १-अ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १२०.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [ कलम २१(२) सह ] नुसार चिमूर नगर परिषद क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक कावि-नपचि-बां. वि.-२४३-२०२०.—

शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. एमयुएन-२०१५/प्र.क्र. २८/नवि-१८, दिनांक ३० मे २०१५ अन्वये चिमूर नगर परिषद नव्याने अस्तित्वात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये चिमूर नगर परिषद क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [ कलम २१(२) सह ] अन्वये चिमूर नगर परिषदेने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ०१, दिनांक ६ ऑक्टोबर २०२० अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार चिमूर नगर परिषदेच्या विकास योजनेमध्ये सामाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा चिमूर नगर परिषदेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत मुख्याधिकारी, चिमूर नगर परिषद यांचेकडे लेखी स्वरुपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

चिमूर :
दिनांक २६ ऑक्टोबर २०२०.

**मंगेश वासेकर,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, चिमूर.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२१.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Declaration of Intention to prepare Development Plan of Chimur Municipal Councils Under Section 23(*1*) [read with Section 21(*2*)] of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. WS-MCC-Const.-D.-243-2020.—

Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* its Notification No. MUN-2015/C.R. 28/UD-18, dated 30th May 2015 constituted Chimur Municipal Council. It is necessary to prepare the Development Plan for the area of Chimur Municipal Councils as per Section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned Development of the said area.

Hence, the Chimur Municipal Council by its Resolution No. 01, dated 6th October 2020 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of Section 23 (*1*) [ read with Section 21 (*2*) ] of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Chimur Municipal council is kept open for inspection by the bublic on office working days, during office hours at the office of the Municipal Council as required under Section 23 (*2*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Chimur Municipal Council within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Chimur :
Dated the 26th October 2020.

MANGESH WASEKAR,
Chief Officer,
Municipal Council, Chimur.

भाग १-अ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १२२.

**मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [कलम २१(२) सह] नुसार गोंडपिपरी नगर पंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक नपंगों-बांध-७६१-२०२०.—

शासनाचे नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमयुएन-२०१४/प्र.क्र. १०२/नवि-१८, दिनांक २३ एप्रिल २०१५ अन्वये गोंडपिपरी नगर पंचायत स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये गोंडपिपरी, नगर पंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [ कलम २१(२) सह ] अन्वये गोंडपिपरी, नगर पंचायतीने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी विशेष सभेचा ठराव क्र. ०२, दिनांक २८ ऑगस्ट २०२० अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार गोंडपिपरी, नगर पंचायतीच्या विकास योजनेमध्ये सामाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा गोंडपिपरी, नगर पंचायतीच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत मुख्याधिकारी, गोंडपिपरी नगर पंचायत यांचेकडे लेखी स्वरुपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

गोंडपिपरी :
दिनांक २४ ऑक्टोबर २०२०.

(अवाच्य),
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, गोंडपिपरी.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२३.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**Declaration of Intention to prepare Development Plan of Gondpipri, Nagar Panchayat u/s 23(*1*) [read with Section 21(*2*)] of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. NPG-Const.-761-2020.—

Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* its Notification No. MUN-2014/C.R. 102/D-18, dated 23rd April 2015 constituted Gondpipri, Nagar Panchayat. It is necessary to prepare the Development Plan for the area of Nagar Panchayat as per Section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned Development of the said area.

Hence, the Gondpipri, Nagar Panchayat by its Resolution No. 02, dated 28th August 2020 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of Section 23 (*1*) [ read with Section 21 (*2*) ] of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Gondpipri, Nagar Panchayat is kept open for inspection by the bublic on office working days, during office hours at the office of the Gondpipri, Nagar Panchayat, as required under Section 23 (*2*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Gondpipri Nagar, Panchayat within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Gondpipri :
Dated the 24th October 2020.

(Illegible),
Chief Officer,
Nagar Panchayat, Gondpipri.

भाग १-अ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १२४.

**अध्यक्षा, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [कलम २१(२) सह] नुसार ब्रम्हपुरी नगर परिषद क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक नपब्र-नियोजन व विकास-४०४-२०२०.—

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) कलम २१(२) अन्वये ब्रम्हपुरी शहराची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी ब्रम्हपुरी नगर परिषदेने सर्वसाधारण सभा दिनांक ४ ऑगस्ट २०२० ठराव क्र. १४ अन्वये जाहीर केला आहे. त्यानुसार नगर परिषदेच्या क्षेत्राधिकाराकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) कलम २१(२) अन्वये विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यात येत आहे. ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या हद्द क्षेत्रात घेणा-या क्षेत्रासाठी विकास योजना करावयाची असल्याने, त्या क्षेत्राचा नकाशा ब्रम्हपूरी नगर परिषदेच्या कार्यालयात सुट्टीचे दिवसाखेरीज कार्यालयीन वेळात नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आला आहे.

ज्या नागरिकांचा नियोजित विकास योजनेच्या हद्दी संबंधित काही सूचना अगर हरकती असल्यास त्यांनी ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल, त्या तारखेपासून ६० दिवसाचे आंत त्यांचे सूचना व हरकती ब्रम्हपुरी नगर परिषदेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. जेणेकरून विकास योजना तयार करतांना प्राप्त झालेल्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल. उशिरा आलेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जाणार नाही.

ब्रम्हपुरी :
दिनांक २७ ऑक्टोबर २०२०.

**सौ. रिताताई दिपक उराडे,**
अध्यक्षा,
नगर परिषद, ब्रम्हपुरी.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२५.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966,**

**Development Plan of Bramhapuri**

No. MCB-Planing-404-2020.—

The Municipal Council, Bramhapuri has declared its intention to prepare the Development Plan of Bramhapuri City/Town by its Resolution No. 14 on General Meeting held on dated 4th August 2020 as per *Maharashtra Regional and Town Planning Act.*, 1966 under Section 23 (*1*), 21(*2*) Plan showing the boundary of the entire area proposed to be included in the Development Plan is open for the inspection to the public in the office of Municipal Council, Bramhapuri at all reasonable hours exclusing leaves and Government holidays for objection and suggestion about the preparation of Development Plan must be given in writing with in a period of sixty days from the publication of the notice in *Official Gazette.*

As per Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 according to Sec. 23(*1*), 21(*2*) objection or suggestion will not be taken in to consideration after time limit.

Bramhapuri :
Dated the 27th October 2020.

SAU. RITATAI DIPAK URADE,
President,
Municipal Council, Bramhapuri.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकांना प्रसिद्ध झालेल्या आहेत.**

**१९**

**मंगळवार, ऑक्टोबर ६, २०२०/आश्विन १४, शके १९४२**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९९.

**प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन तथा विभागीय आयुक्त यांजकडून**

**महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.—**

**संदर्भ—** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ नागपूर विभागीय पुरवणी दिनांक ३१ जुलै २०२०.

**सुधारित आदेश**

क्रमांक एमयुएन १९ (३)-कावि-१८२–२०२०.—

संदर्भिय राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेस (आदेशास) सुधारीत आदेश पुढीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) मधील तरतुदीस अनुसरून २०११ च्या जनगणनेची लोकसंख्या विचारात घेऊन (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्या लोकसंख्येसह) गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड नगरपंचायत क्षेत्रासाठी एकूण निवडून येणा-या सदस्यांची संख्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे स्त्री सदस्यांची संख्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या सदस्य संख्येसह) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित सदस्य संख्या निश्चित करण्यात येत आहे.

या आदेशाप्रमाणे खालील तक्त्यात नमूद प्रमाणे भामरागड नगर पंचायतची सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे.

**तक्ता**

| नगर पंचायतीचे नाव | लहान नागरी क्षेत्राचे नाव | लहान नागरी क्षेत्राचा वर्ग | एकूण निवडून द्यावयाची सदस्य संख्या | रकाना (४) पैकी प्रवर्गासाठी राखून ठेवलेली सदस्य संख्या | | | | रकाना (४) पैकी स्त्रियांसाठी एकूण राखीव सदस्य संख्या | रकाना (९) पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची प्रवर्गानुसार विभागणी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनुसूचित जाती साठी | अनुसूचित जमाती साठी | नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी | सर्वसाधारण | | अनुसूचित जातीसाठी [रकाना (५) पैकी] | अनुसूचित जमाती साठी [रकाना (६) पैकी] | नागरी-कांच्या मागास प्रवर्गासाठी [रकाना (७) पैकी] | सर्व-साधारण [रकाना (८) पैकी] |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| भामरागड नगर पंचायत | भामरागड नगर पंचायत | "क" | १७ | १ | ११ | ५ | ० | ९ | १ | ६ | २ | ० |

नागपूर :
दिनांक ६ ऑक्टोबर २०२०.

**डॉ. संजीव कुमार,**
प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन
तथा विभागीय आयुक्त नागपूर.

ना.-एक-अ-३ (१६४४).

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १००.

BY REGIONAL DIRECTOR, MUNICIPAL ADMINISTRATION AND DIVISIONAL COMMISSIONER

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.—

*Ref* :— Maharashtra Government Gazette Extra-Ordinary Part-I-A Nagpur Divisional Supplement dated 31st July 2020.

*REVISED ORDER*

No. Mun-19(3)-WS-182-2019.—

With Reference to above Notification (Order) which was published in the Maharashtra Government Gazette the Revised Order to be published as under :

Under Section 9(*2*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 taking into consideration population figures of Census of India, 2011 (including the population of Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens), the number of elected Councillors in respect of Bhamragad Nagar Panchayat Area in Nagpur District is fixed as mentioned in the following table.

Similarly, the number of seats to be reserved for women (including the seats belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens) and the number of seats to the reserved for Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens are also fixed as mentioned in the Table.

The General Elections of the Bhamragad Nagar Panchayat should be held as per this order.

TABLE

| Name of Nagar Panchayat | Name of Smaller Urban Area | Class of Smaller Urban Area | No. of Elected Councillors | Out of Col. (4) No. of Seats Reserved For following category | | | | Out of column (4) Total No. of seats reserved for women | Out of Col. (9) No. of Seats Reserved for women following category | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Scheduled Castes | Scheduled Tribes | Backward Class of Citizens | General | | Scheduled Castes [Out of Col. (6)] | Scheduled Tribes [Out of Col. (7)] | Backward Class of Citizens [Out of Col. (8)] | General |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) |
| Bhamragad Nagar Panchayat | Bhamragad Nagar Panchayat | "C" | 17 | 1 | 11 | 5 | 0 | 9 | 1 | 6 | 2 | 0 |

Nagpur :
Dated the 6th October 2020.

Dr. SANJEEV KUMAR,
Regional Director,
Municipal Administration And
Divisional Commissioner, Nagpur.

२०

**शुक्रवार, ऑक्टोबर २३, २०२०/कार्तिक १, शके १९४२**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०१.

**प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन तथा विभागीय आयुक्त, यांजकडून**

**महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.—**

**आदेश**

क्रमांक एमयुएन १९ (३)-कावि-२००–२०२०.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) मधील तरतुदीस अनुसरून २०११ च्या जनगणनेची लोकसंख्या विचारात घेऊन (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्या लोकसंख्येसह) चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी नगर पंचायत क्षेत्रासाठी एकूण निवडून येणा-या सदस्यांची संख्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे स्त्री सदस्यांची संख्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी असलेल्या सदस्य संख्येसह) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित सदस्य संख्या निश्चित करण्यात येत आहे.

या आदेशाप्रमाणे खालील तक्त्यात नमूद प्रमाणे गोंडपिपरी नगर पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे.—

**तक्ता**

| नगर पंचायतीचे नाव | लहान नागरी क्षेत्राचे नाव | लहान नागरी क्षेत्राचा वर्ग | एकूण निवडून द्यावयाची सदस्य संख्या | रकाना (४) पैकी प्रवर्गासाठी राखून ठेवलेली सदस्य संख्या | | | | रकाना (४) पैकी स्त्रियांसाठी एकूण राखीव सदस्य संख्या | रकाना (९) पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची प्रवर्गानुसार विभागणी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनुसूचित जाती साठी | अनुसूचित जमाती साठी | नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी | सर्वसाधारण | | अनुसूचित जातीसाठी [रकाना (५) पैकी] | अनुसूचित जमाती साठी [रकाना (६) पैकी] | नागरी-कांच्या मागास प्रवर्गासाठी [रकाना (७) पैकी] | सर्व-साधारण [रकाना (८) पैकी] |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| गोंडपिपरी नगर पंचायत | गोंडपिपरी नगर पंचायत | "क" | १७ | २ | ३ | ५ | ७ | ९ | १ | २ | ३ | ३ |

**डॉ. संजीव कुमार,**
प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन
तथा विभागीय आयुक्त, नागपूर.

नागपूर :
दिनांक २२ ऑक्टोबर २०२०.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०२.

BY REGIONAL DIRECTOR, MUNICIPAL ADMINISTRATION AND DIVISIONAL COMMISSIONER

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.—

*ORDER*

No. Mun-19(3)-WS-200-2020.—

Under Section 9(*2*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 taking into consideration population figures of Census of India, 2011 (including the population of Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens), the number of elected Councillors in respect of Gondpipri Nagar Panchayat Area in Chandrapur District is fixed as mentioned in the following Table.

Similarly, the number of seats to be reserved for Women (including the seats belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens) and the number of seats to be reserved for Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens are also fixed as mentioned in the Table.

The General Elections of the Gondpipri Nagar Panchayat should be held as per this order.

TABLE

| Name of Nagar Panchayat | Name of Smaller Urban Area | Class of Smaller Urban Area | No. of Elected Councillors | Out of Col. (4) No. of Seats Reserved For following category | | | | Out of column (4) Total No. of seats reserved for Women | Out of Col. (9) No. of Seats Reserved for Women of following category | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Scheduled Castes | Scheduled Tribes | Backward Class of Citizens | General | | Scheduled Castes [Out of Col. (5)] | Scheduled Tribes [Out of Col. (6)] | Backward Class of Citizens [Out of Col. (7)] | General [Out of Col. (8)] |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) |
| Gondpipri Nagar Panchayat | Gondpipri Nagar Panchayat | "C" | 17 | 2 | 3 | 5 | 7 | 9 | 1 | 2 | 3 | 3 |

Nagpur :
Dated the 22nd October 2020.

Dr. SANJEEV KUMAR,
Regional Director, Municipal Administration
And Divisional Commissioner, Nagpur.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०३.

**प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन तथा विभागीय आयुक्त, यांजकडून**

**महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.—**

**आदेश**

क्रमांक एमयुएन १९ (३)-कावि-२०१–२०२०.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) मधील तरतुदीस अनुसरून २०११ च्या जनगणनेची लोकसंख्या विचारात घेऊन (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्या लोकसंख्येसह) चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना नगर पंचायत क्षेत्रासाठी एकूण निवडून येणा-या सदस्यांची संख्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे स्त्री सदस्यांची संख्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी असलेल्या सदस्य संख्येसह) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित सदस्य संख्या निश्चित करण्यात येत आहे.

या आदेशाप्रमाणे खालील तक्त्यात नमूद प्रमाणे कोरपना नगर पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे.

**तक्ता**

| नगर पंचायतीचे नाव | लहान नागरी क्षेत्राचे नाव | लहान नागरी क्षेत्राचा वर्ग | एकूण निवडून द्यावयाची सदस्य संख्या | रकाना (४) पैकी प्रवर्गासाठी राखून ठेवलेली सदस्य संख्या | | | | रकाना (४) पैकी स्त्रियांसाठी एकूण राखीव सदस्य संख्या | रकाना (९) पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची प्रवर्गानुसार विभागणी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनुसूचित जाती साठी | अनुसूचित जमाती साठी | नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी | सर्वसाधारण | | अनुसूचित जातीसाठी [रकाना (५) पैकी] | अनुसूचित जमाती साठी [रकाना (६) पैकी] | नागरि-कांच्या मागास प्रवर्गासाठी [रकाना (७) पैकी] | सर्व-साधारण [रकाना (८) पैकी] |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| कोरपना नगर पंचायत | कोरपना नगर पंचायत | "क" | १७ | २ | ३ | ५ | ७ | ९ | १ | २ | ३ | ३ |

**डॉ. संजीव कुमार,**
प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन
तथा विभागीय आयुक्त, नागपूर.

नागपूर :
दिनांक २२ ऑक्टोबर २०२०.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०४.

BY REGIONAL DIRECTOR, MUNICIPAL ADMINISTRATION AND DIVISIONAL COMMISSIONER

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.—

*ORDER*

No. Mun-19(3)-WS-201-2020.—

Under Section 9(*2*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 taking into consideration population figures of Census of India, 2011 (including the population of Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens), the number of elected Councillors in respect of Korpana Nagar Panchayat Area in Chandrapur District is fixed as mentioned in the following Table.

Similarly, the number of seats to be reserved for Women (including the seats belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens) and the number of seats to be reserved for Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens are also fixed as mentioned in the Table.

The General Elections of the Korpana Nagar Panchayat should be held as per this order.

TABLE

| Name of Nagar Panchayat | Name of Smaller Urban Area | Class of Smaller Urban Area | No. of Elected Councillors | Out of Col. (4) No. of Seats Reserved For following category | | | | Out of Column (4) Total No. of seats reserved for Women | Out of Col. (9) No. of Seats Reserved for Women of following category | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Scheduled Castes | Scheduled Tribes | Backward Class of Citizens | General | | Scheduled Castes [Out of Col. (5)] | Scheduled Tribes [Out of Col. (6)] | Backward Class of Citizens [Out of Col. (7)] | General [Out of Col. (8)] |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) |
| Korpana Nagar Panchayat | Korpana Nagar Panchayat | "C" | 17 | 2 | 3 | 5 | 7 | 9 | 1 | 2 | 3 | 3 |

Dr. SANJEEV KUMAR,
Regional Director, Municipal Administration
And Divisional Commissioner, Nagpur.

Nagpur :
Dated the 22nd October 2020.

ना.-एक-अ-४(१६४४).

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०५.

**प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन तथा विभागीय आयुक्त, यांजकडून**

**महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.—**

**आदेश**

क्रमांक एमयुएन १९ (३)-कावि-२०२–२०२०.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) मधील तरतुदीस अनुसरून २०११ च्या जनगणनेची लोकसंख्या विचारात घेऊन (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्या लोकसंख्येसह) चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती नगर पंचायत क्षेत्रासाठी एकूण निवडून येणा-या सदस्यांची संख्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे स्त्री सदस्यांची संख्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी असलेल्या सदस्य संख्येसह) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित सदस्य संख्या निश्चित करण्यात येत आहे.

या आदेशाप्रमाणे खालील तक्त्यात नमूदप्रमाणे जिवती नगर पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे.

**तक्ता**

| नगर पंचायतीचे नाव | लहान नागरी क्षेत्राचे नाव | लहान नागरी क्षेत्राचा वर्ग | एकूण निवडून द्यावयाची सदस्य संख्या | रकाना (४) पैकी प्रवर्गासाठी राखून ठेवलेली सदस्य संख्या | | | | रकाना (४) पैकी स्त्रियांसाठी एकूण राखीव सदस्य संख्या | रकाना (९) पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची प्रवर्गानुसार विभागणी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनुसूचित जाती साठी | अनुसूचित जमाती साठी | नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी | सर्वसाधारण | | अनुसूचित जातीसाठी [रकाना (५) पैकी] | अनुसूचित जमाती साठी [रकाना (६) पैकी] | नागरि-कांच्या मागास प्रवर्गासाठी [रकाना (७) पैकी] | सर्व-साधारण [रकाना (८) पैकी] |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| जिवती नगर पंचायत | जिवती नगर पंचायत | “ क ” | १७ | १ | ३ | ५ | ८ | ९ | ० | २ | ३ | ४ |

**टिप :** यापूर्वी नजिकच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती करिता उपलब्ध जागा अनुसूचित जातीच्या महिला करिता वापरण्यात आलेली आहे. त्यामुळे मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश क्र. रानिआ/नपा-२०१८/प्र.क्र. १०/का-६, दिनांक १५ जून, २०१६ नुसार आगामी सार्वत्रिक निवडणुकीमध्ये अनुसूचित जातीकरीता उपलब्ध जागा अनुसूचित जातीच्या महिलेकरिता राखीव राहणार नाही.

**डॉ. संजीव कुमार,**
प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन
तथा विभागीय आयुक्त, नागपूर.

नागपूर :
दिनांक २२ ऑक्टोबर २०२०.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०६.

BY REGIONAL DIRECTOR, MUNICIPAL ADMINISTRATION AND DIVISIONAL COMMISSIONER

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.—

*ORDER*

No. Mun-19(3)-WS-202-2020.—

Under Section 9(*2*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 taking into consideration population figures of Census of India, 2011 (including the population of Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens), the number of elected Councillors in respect of Jivti Nagar Panchayat Area in Chandrapur District is fixed as mentioned in the following Table.

Similarly, the number of seats to be reserved for Women (including the seats belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens) and the number of seats to the reserved for Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens are also fixed as mentioned in the Table.

The General Elections of the Jivti Nagar Panchayat should be held as per this order.

TABLE

| Name of Nagar Panchayat | Name of Smaller Urban Area | Class of Smaller Urban Area | No. of Elected Councillors | Out of Col. (4) No. of Seats Reserved For following category | | | | Out of Column (4) Total No. of seats reserved for Women | Out of Col. (9) No. of Seats Reserved for Women of following category | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Scheduled Castes | Scheduled Tribes | Backward Class of Citizens | General | | Scheduled Castes [Out of Col. (5)] | Scheduled Tribes (Out of Col. 6) | Backward Class of Citizens (Out of Col. 7) | General [Out of Col. (8)] |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) |
| Jivti Nagar Panchayat | Jivti Nagar Panchayat | "C" | 17 | 1 | 3 | 5 | 8 | 9 | 0 | 2 | 3 | 4 |

*Note :* Earlier, in the nearest General election, the available seats for the Scheduled Castes have been used for the Scheduled Castes Women in this category. Therefore, as per RNIA/NPA-2018/No. 10/Ka-6, dated 15th June 2016, the seats available for the Scheduled Castes shall not be reserved for the Scheduled Castes Women as per the order of the State Election Commission, Maharashtra.

Dr. SANJEEV KUMAR,
Regional Director, Municipal Administration
And Divisional Commissioner, Nagpur.

Nagpur :
Dated the 22nd October 2020.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.